# २. पाश्चिमात्य आणि भारतीय समाजशास्त्रज्ञांचे योगदान

२.१ पाश्चिमात्य समाजशास्त्रज्ञांचा परिचय

२.२ भारतीय समाजशास्त्रज्ञांचा परिचय

**प्रस्तावना**



*अब्दुल रहमान इब्न-खाल्दुन :*

समाजशास्त्र ही पाश्चिमात्य कल्पना आहे असे मानले जाते. पण काही विचारवंत, अभ्यासक जगाच्या वेगवेगळ्या भागांत खूप पूर्वीपासून समाजशास्त्र उपयोगात आणत होते.

अब्दुल रहमान इब्न-खाल्दुन यांचा जन्म उत्तर आफ्रिकेत ट्युनिस येथे झाला होता. राजकारणात सक्रिय राहिले. त्यांनी ट्युनिस, मोरोक्को, स्पेन येथील सुलतानांना सेवा पुरवली. ते शैक्षणिक क्षेत्रात परतले. त्यांनी समाजाचा शास्त्रशुद्‌ध अभ्यास, अनुभवाधिष्ठित संशोधन आणि सामाजिक घटनांमागील कारणांचा अभ्यास यांवर भर दिला. विविध सामाजिक संस्था आणि त्यांच्यातील परस्परसंबंध यांच्या अभ्यासावर त्यांनी भर दिला. प्राथमिक अवस्थेतील समाज व आधुनिक समाज यांच्या तुलनात्मक अभ्यासातही त्यांना रस होता.

ऑगस्ट कॉम्त आणि एमिल डरखाईम यांनी फ्रान्समध्ये समाजशास्त्राचा पाया रचला त्यामुळे फ्रान्स ही समाजशास्त्राची जन्मभूमी मानली जाते. ही समाजशास्त्रीय परंपरा नंतरच्या काळात यथावकाशपणे इतर युरोपीय आणि पाश्चिमात्य देशात पसरली.

समाजशास्त्राचा विकास फक्त पाश्चिमात्य जगापुरताच मर्यादित नाही. भारतातही समाजशास्त्राचा विकास झाला आहे. समाजशास्त्रात अनेक भारतीय समाजशास्त्रज्ञांनी मोलाचे योगदान दिले आहे. या पाठात आपण ऑगस्ट कॉम्त, एमिल डरखाईम व कार्ल मार्क्स हे पाश्चिमात्य विचारवंत तसेच जी.एस. घुर्ये, एम.एन. श्रीनिवास आणि इरावती कर्वे हे भारतीय विचारवंत अशा सहा समाजशास्त्रीय विचारवंतांचे योगदान अभ्यासणार आहोत.

या प्रत्येक समाजशास्त्रज्ञाने समाजशास्त्राच्या व्यापक कक्षेत राहून महत्त्वाचे संशोधन केले आहे. त्यांच्या अभ्यासविषयाशी व क्षेत्राशी निगडित अनेक महत्त्वपूर्ण संकल्पना त्यांनी विकसित केल्या. तसेच सामाजिक वर्तनाचे स्पष्टीकरण देताना अनेक दिशादर्शी सिद्‌धांतांची निर्मिती केली.

## २.१ पाश्चिमात्य समाजशास्त्रज्ञांचा परिचय

### ऑगस्ट कॉम्त (१७९८ ते १८५७)



ऑगस्ट कॉम्त

ऑगस्ट कॉम्त, यांना समाजशास्त्राचा जनक मानले जाते. त्यांचा जन्म १९ जानेवारी १७९८ मध्ये फ्रान्समध्ये मॉन्टपेलियर येथे झाला. त्यांचे पूर्ण नाव 'इसिडोर ऑगस्ट मॅरिक फ्रँकॉइस झेवियर कॉम्त'

असे होते. ते बंडखोर वृत्तीचे व प्रस्थापित व्यवस्थेला आव्हान देणारे होते. ते गणिततज्ञ व तत्ववेत्ते होते. वयाच्या अवघ्या १४ व्या वर्षी त्यांनी 'समाजाच्या पुनर्रचनेची' गरज व्यक्त केली होती.



**हॅरियट मार्टिनॉ (१८०२-१८७६):** या ब्रिटिश सामाजिक विचारवंत होत्या. काही विचारवंताच्या मते त्या पहिल्या स्त्री समाजशास्त्रज्ञ होत्या. त्यांनी अनेक ग्रंथ व निबंध लिहिले. कॉम्त यांनी 'Cours de Philosophie Positive' हा फ्रेंच भाषेतील ग्रंथ १८३९ मध्ये प्रकाशित केला. मार्टिनॉ यांनी याच ग्रंथाचे दोन विभागांत १८५३ मध्ये भाषांतर केले. त्याचे नाव 'The Positive Philosophy of August Comte' होय. हे त्यांचे अतिशय मोलाचे योगदान होते. कॉम्त यांची इंग्रजी भाषा बोलणाऱ्या जगाशी ओळख करून देण्याचे श्रेय मार्टिनॉ यांना जाते.

'सोसायटी इन अमेरिका' हा त्यांचा १९३७ सालामधील प्रसिद्ध ग्रंथ आहे. या ग्रंथातील त्यांचे विचार हे समाजशास्त्रीय पद्धतीचे उत्तम उदाहरण आहे. मार्टिनॉ यांच्या मते, ''समाजाचा अभ्यास करताना, त्यांच्या राजकीय, धार्मिक आणि सामाजिक संस्थांच्या सर्व पैलूंचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे.'' त्याचबरोबर त्यांनी स्त्रियांच्या अभ्यासाचा यामध्ये समावेश करण्याचा आग्रह धरला. विवाह, मुले, धार्मिक व्यवहार आणि वंश यांसारख्या मुद्द्यांचा अभ्यास करणाऱ्या त्या पहिल्याच समाजशास्त्रज्ञ होय. त्यांच्या मते, जर आपल्याला स्त्रियांचे दुय्यम स्थान समजून घ्यायचे असेल तर समाजाचा समग्र अभ्यास करणे गरजेचे आहे.

'तीन अवस्थांचा नियम', 'प्रत्यक्षवाद', 'विज्ञानांचे वर्गीकरण' असे सिद्धान्त त्यांनी मांडले. समाजशास्त्राचे वर्णन करताना त्यांनी 'स्थितिशीलता' आणि 'गतिशीलता' या घटकांचा विचार केला.

त्यांचे असे मत होते की, ज्याप्रमाणे मानवी मनाची उत्क्रांती होते त्याचप्रमाणे समाज मनाचीही होते. प्रत्येक व्यक्तीचा विकास बालपण त्यानंतर चौकस पौगंडावस्था आणि सहज स्वाभाविक तात्त्विक प्रौढावस्था या अवस्थांतून होतो तसाच समाजाचा विकासही अशाच अवस्थांतून होतो असे त्यांचे मत होते.

कॉम्तचे सामाजिक तत्वज्ञान हे मानवी विचारांच्या तीन अवस्थांच्या संकल्पनेवर आधारित आहे. त्यांच्या मते मानवी ज्ञान हे उत्क्रांतीच्या तीन अवस्थांमधून संक्रमित होत गेले आहे.

(१) धार्मिक अवस्था
(२) तात्त्विक/अध्यात्मिक अवस्था
(३) वैज्ञानिक/प्रत्यक्षवादी अवस्था.

**(१) धार्मिक/धर्मशास्त्रीय अवस्था :** या पहिल्या अवस्थेत मानवाच्या विचार आणि कल्पनांवर पूर्णपणे अलौकिक आणि अनैसर्गिक घटकांचा पगडा होता. माणसाचा असा विश्वास होता की, जगातील सर्व घटना या देवाकडून नियंत्रित केल्या जातात किंवा घडवल्या जातात. माणसाचा देवावर आणि अमानवी शक्तींवर आत्यंतिक विश्वास होता. माणूस असे मानत होता की, सर्व घटना या अनैसर्गिक व अमानवी शक्तींमुळे घडतात. उदा., सर्व नैसर्गिक आपत्ती या देवाच्या कोपामुळे घडून येतात.


**(२) अध्यात्मिक तात्त्विक अवस्था :** या अवस्थेलाच वैचारिक विकासाची अमूर्त अवस्था असे म्हटले जाते. या अवस्थेत अतिंद्रिये अमानवी शक्तींवरील विश्वास हळूहळू अमूर्त स्वरूपाच्या शक्तीवर बसू लागतो. या अमानवी शक्तींमुळेच

मानवाच्या आणि निसर्गाच्या सर्व हालचाली नियंत्रित होत असतात असे मानले जाते. पहिल्या अवस्थेपेक्षा वैचारिक पातळीत दुसऱ्या अवस्थेत बराच विकास झालेला दिसून येतो. 'एकच देव' या संकल्पनेत बराच बदल या अवस्थेत होतो. त्यामुळे बरीचशी सुधारणा मानवाच्या विचार प्रक्रियेत झालेली असते असे कॉम्तचे मत होते.

**(३) वैज्ञानिक/प्रत्यक्षवादी अवस्था :** कॉम्तच्या मते ही मानवी विचारांची सुधारित आणि वैज्ञानिक अवस्था असते. कल्पनांची जागा निरीक्षणांनी घेतलेली असते. प्रत्येक गोष्टीची कारणमीमांसा करणे, परीक्षण करणे या गोष्टींना या अवस्थेत महत्व प्राप्त होते. यात सामाजिक जीवनातील घटनांचे तथ्यांच्या साहाय्याने नियमांत रूपांतर करण्याचा किंवा नियम प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला जातो.

कॉम्तला समाजशास्त्राचा विकासही अशाच अवस्थांमधून अपेक्षित होता. म्हणूनच हा तीन अवस्थांचा नियम' त्याने ज्ञान, सामाजिक संघटन आणि इतर घटकांनाही लागू केला.

## एमिल डरखाईम (१८५८-१९१७)



एमिल डरखाईम

फ्रान्समधील एपिनल या खेड्यात १५ एप्रिल १८५८ रोजी डरखाईमचा जन्म झाला. अत्यंत हुशार विद्यार्थी म्हणून त्याला कॉलेजमध्ये अनेक बक्षिसे व पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले होते.

डरखाईमने सामाजिक तथ्य, सामाजिक ऐक्य, सामूहिक प्रतिनिधित्व, सामाजिक मूल्ये, ज्ञानाचे समाजशास्त्र आणि समाजातील नैतिकता, गुन्हा आणि शिक्षा यांवर आपल्या अभ्यासात भर दिला.

### डरखाईमचा आत्महत्येचा सिद्धान्त

डरखाईमने आत्महत्येचे विस्तृत असे विवेचन त्यांच्या 'ल स्युसाईड' या ग्रंथात केले आहे. त्यांच्या मते 'आत्महत्या हे एक सामाजिक तथ्य आणि घटना आहे'. डरखाईमच्या मते आत्महत्येला वैयक्तिक कमकुवतपणा, मानसिक नैराश्य किंवा कोणतेही वैयक्तिक आर्थिक किंवा कौटुंबिक घटक कारणीभूत नसतात. त्यांच्या मते, आत्महत्या हे एक सामाजिक तथ्य आहे. खूप मोठ्या प्रमाणावर सर्वेक्षण करून डरखाईमने हे पटवून दिले की आत्महत्या ही सामाजिक बाब आहे.

जेव्हा सामाजिक ऐक्य किंवा समाजाबरोबरची एकरूपता नष्ट होते तेव्हा आत्महत्या हा घटक सक्रिय होतो. तसेच माणसावर नकारात्मक दबाव, नैतिक मूल्यांचा ऱ्हास किंवा मूल्य संघर्ष निर्माण होतो तेव्हा आत्महत्या घडून येण्याची शक्यता असते.

**आत्महत्येची व्याख्या** "प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष, सकारात्मक किंवा नकारात्मक व्यक्तीकडून केली जाणारी कृती की जिचा शेवट आत्मनाशामध्ये होतो, त्यास आत्महत्या असे म्हणतात."

**आत्महत्येचे प्रकार** :

डरखाईमच्या मते आत्महत्येचे पुढील प्रकार आहेत.

**१. आत्मकेंद्रित आत्महत्या:** जेव्हा व्यक्ती समाजापासून वेगळी होते तेव्हा एकटेपणाची भावना निर्माण होते किंवा समाजात त्याला कोणतेही महत्व राहिले नाही असे वाटू लागते तेव्हा ती व्यक्ती स्वतःला संपवण्याचा प्रयत्न करते. व्यक्ती जेव्हा स्वतःतच रममाण झालेली असते आणि समाजातील इतर कोणाशीही देणे-घेणे राहत नाही त्या वेळेस व्यक्ती आत्मकेंद्रित आत्महत्या करते. ज्या व्यक्ती एकलकोंड्या, आत्ममग्न असतात किंवा ज्याची इतरांबरोबर राहण्याची इच्छाशक्ती नष्ट झालेली असते त्या या प्रकारची आत्महत्या करतात.

**२. नियमनविरहित/प्रमाणकशून्य आत्महत्या :** नियमनांचा ऱ्हास, कायद्यांचे उल्लंघन, मूल्यांचे अवमूल्यन अशा परिस्थितीस नियमनविरहितता असे म्हणतात. अचानकपणे निर्माण झालेल्या एखाद्या परिस्थितीशी जुळवून घेण्यास व्यक्ती जेव्हा असमर्थ ठरते तेव्हा नियमनविरहित आत्महत्या केली जाते. या अवस्थेत नियमनांपासून व्यक्तींची, समाजाची फारकत झालेली असते. डरखाईमच्या मते, जेव्हा आर्थिक मंदी किंवा खूप भरभराट होते, तेव्हा नियमनविरहित आत्महत्या घडतात.

**३. परार्थवादी/परहितवादी आत्महत्या :** हा प्रकार आत्मकेंद्रित आत्महत्येच्या अगदी विरोधी स्वरूपात आहे. यात व्यक्ती समाजाबरोबर इतकी एकरूप होते आणि समाजात इतरांचे भले व्हावे म्हणून आत्महत्या करण्यासाठी प्रवृत्त होते. ही मूल्याधिष्ठित कृती मानली जाते. जपानी लोकांची हाराकिरी किंवा पूर्वीच्या काळातील सतीप्रथा ही परार्थवादी आत्महत्येची उदाहरणे आहेत.

**४. दैववादी आत्महत्या :** जेव्हा अतिरिक्त सामाजिक दडपण आणि हस्तक्षेपामुळे व्यक्ती खचून जाते तेव्हा या प्रकारची आत्महत्या घडते.

आत्महत्येच्या सिद्धान्ताची मांडणी करताना डरखाईमने सामाजिक घटक, सामाजिक परिस्थिती हे कसे आत्महत्येस जबाबदार घटक असतात व आत्महत्या हे कसे सामाजिक तथ्य आहे हे स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.



विलियम ड्युब्योई

**विलियम ड्युब्योई (१८६८-१९६३):** हे एक अमेरिकन समाजशास्त्रज्ञ, इतिहासतज्ञ, नागरी हक्क कार्यकर्ता, लेखक आणि संपादक होते. २० व्या शतकाच्या सुरुवातीच्या काळातील अमेरिकेतील एक सर्वांत महत्त्वाचे कृष्ण वर्णीय वंशाचे विरोधक नेते म्हणून ते नावाजले गेले होते. त्यांनी अनेक ग्रंथ लिहिले. समाजशास्त्रीय अध्ययनामधील वंश आणि वंशभेदाची ओळख हे त्यांचे महत्त्वाचे योगदान आहे.

ते हार्वर्ड विद्यापीठातून पीएच.डी. मिळवणारे पहिलेच आफ्रिकन कृष्णवर्णीय वंशाचे विद्यार्थी होत. त्यांनी सांस्कृतिक राष्ट्रवादाचा पुरस्कार केला व कृष्णवर्णीय कला व साहित्याला प्रोत्साहन दिले. त्यांच्या मते, वाचकांनी कृष्णवर्णीय साहित्यातील सौंदर्य टिपायला शिकले पाहिजे.

त्यांनी आफ्रिकेतील कृष्णवर्णीय समाजाच्या स्थितीचा अभ्यास करण्यासाठी समाजशास्त्रात पहिल्यांदाच मोठ्या प्रमाणावर क्षेत्रीय अभ्यासाचा वापर केला. फिलाडेल्फियामधील जवळजवळ २५०० कृष्णवर्णीय लोकांच्या त्यांनी मुलाखती घेतल्या. या संशोधनावर आधारित त्यांनी त्यांचा 'द फिलाडेल्फिया निग्रो' (१८९९) हा ग्रंथ लिहिला. त्याचबरोबर त्यांनी अतिशय सखोल पद्धतीने कृष्णवर्णीय कामगारांच्या शोषणाचे समाजशास्त्रीय विश्लेषण केले. त्यांच्या मते, कृष्णवर्णीय कामगारांनी उत्पादक आणि ग्राहक यांच्या सहकारी तत्त्वावर उभी असणारी अशी एक स्वतंत्र अर्थव्यवस्था निर्माण करावी. हीच अर्थव्यवस्था आर्थिक विषमता आणि कृष्णवर्णीय लोकांचे दारिद्र्य मिटवू शकेल.

## कार्ल मार्क्स (१८१८ ते १८८३)



कार्ल मार्क्स

कार्ल मार्क्स हा जर्मन अभ्यासक, तत्ववेत्ता, अर्थशास्त्रज्ञ, इतिहासकार, राजकीय विचारवंत, समाजशास्त्रज्ञ, पत्रकार, वकील आणि थोर क्रांतिकारक होता. मार्क्सला साम्यवादाचा रचनाकार मानले जाते. त्यांचे विचार हे संपूर्ण जगात अत्यंत सामर्थ्यशाली व प्रभावी ठरले.

> भांडवलशाही ही एक अशी अर्थव्यवस्था आहे जी नफ्यावर आधारित असलेला स्पर्धात्मक बाजार, कामगार, खाजगी मालमत्ता आणि उत्पादनाच्या साधनांच्या मालकीवर अवलंबून असते.

## मार्क्सचा वर्ग संघर्षाचा सिद्धान्त

वर्ग संघर्षाचा सिद्धान्त ही संकल्पना मार्क्सच्या विचारांच्या केंद्रस्थानी आहे. त्याच्या साम्यवादी जाहीरनाम्यामध्ये त्याने असे म्हटले आहे की, इतिहासाच्या प्रत्येक अवस्थेमध्ये दोन वर्गांमध्ये संघर्ष झालेला आहे. भांडवलदार आणि कामगार या दोन वर्गांमध्ये कायम वैरभाव आणि द्वेषभाव दिसून येतो.

मार्क्सच्या मते, 'आर्थिक घटक हाच समाजातील वर्गांचा पाया असतो.' त्यांच्या तत्वज्ञानात ते वर्गीय स्तरीकरणाला सर्वोच्च महत्त्व देतात. त्यांनी इतिहासाचा अन्वयार्थ वर्ग संघर्षाच्या दृष्टिकोनातूनच मांडला आहे.

समाजातील वर्ग म्हणजेच आर्थिक वर्ग होय, जे मुख्यत्वेकरून उत्पादन आणि आर्थिक विकासाच्या वितरण प्रक्रियेवर आधारित असतात.

**कार्ल मार्क्सने केलेले भांडवलशाही समाजातील वर्ग संघर्षाचे विश्लेषण पुढीलप्रमाणे सारांशरूपात मांडता येते.**

१. **मालमत्तेचे महत्त्व :** मार्क्सच्या मते, संपत्तीचे स्वरूप हे कोणत्याही समाजाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य असते. उत्पादनाच्या साधनांशी व्यक्तीचे नाते काय आहे यावर वर्गव्यवस्था ठरत असते.

२. **वर्गांचे ध्रुवीकरण :** संपूर्ण समाजाचे दोन भिन्न वर्गांमध्ये विभाजन होत असते. वैरभाव असणारे हे वर्ग असतात. भांडवलशाही समाजव्यवस्थेत अत्यंत तीव्र असे वर्गांचे ध्रुवीकरण होणे हे स्वाभाविक असते.

> **उपक्रम – १**
>
> "वर्गांचे ध्रुवीकरण" आणि "वर्गांचे ऐक्य" वर्तमानकाळात प्रासंगिक आहे का? यावर चर्चा करा.

३. **अतिरिक्त मूल्य :** कामगारांचे शोषण करून भांडवलदार अतिरिक्त नफा कमवत असतो.

४. **दारिद्र्यात वाढ :** कामगारांच्या वाढत्या शोषणातून कामगार वर्गाच्या दारिद्र्यात वाढ होत असते. मार्क्सच्या मते, हे दारिद्र्य हा साधनांच्या दुर्मीळतेचा परिणाम नसून तो कामगारांच्या शोषणाचा परिणाम आहे.

५. **परात्मता/अलगता :** आर्थिक शोषण आणि अत्यंत प्रतिकूल स्थिती यांमुळे कामगारांना परात्मतेला सामोरे जावे लागते. काम ही कामगाराची अभिव्यक्ती राहत नसून अत्यंत खालावलेले जीवनमान ही त्याची ओळख बनते. कामगार हा स्वत:पासून, कामापासून आणि उत्पादनापासून अलग किंवा परात्म होतो.

६. **वर्गांचे ऐक्य आणि संघर्ष :** वाढत्या वर्गाविषयक

जाणिवेमुळे एका वर्गातील व्यक्तींमध्ये एकात्मता वाढत जाते व विरुद्ध वर्गाबद्दल आत्यंतिक द्वेषभाव वाढतो.

७. **क्रांती:** या वर्ग संघर्षाचा शेवट क्रांतीने होतो. यामुळे भांडवलशाही समाजाच्या रचनेचा ऱ्हास होतो.

८. **कामगारांची हुकूमशाही:** क्रांतीनंतर कामगारांची हुकूमशाही प्रस्थापित होते. भांडवलदार वर्गाचा क्रांतीत अस्त होतो. मार्क्सच्या मते, ही एक संक्रमण अवस्था आहे.

९. **साम्यवादी समाजाचा उदय:** खासगी मालमत्तेच्या विनाशानंतरच वर्ग आणि वर्ग संघर्ष संपुष्टात येईल. मार्क्सने म्हटल्याप्रमाणे वर्गविरहित समाजात अंतिमतः राज्यसंस्थादेखील लोप पावेल. या समाजव्यवस्थेत कोणाकडेच खासगी मालकी हक्क नसेल. प्रत्येक व्यक्ती आपल्या कुवतीनुसार कामाला हातभार लावेल आणि त्याच्या/तिच्या गरजांनुसार त्यांची मिळकत असेल.

## २.२ भारतीय समाजशास्त्रज्ञांचा परिचय

'समाजशास्त्र' आणि 'सामाजिक मानववंशशास्त्र' हे दोन्ही विषय भारतात ब्रिटनमधून आले. जे ब्रिटिश अभ्यासक भारतात राहिले आणि नंतर जे भारतीय अभ्यासक ब्रिटन आणि अमेरिकेत शिक्षणासाठी गेले त्यांनी हे दोन्ही विषय भारतात आणण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. १९१९ मध्ये मुंबई विद्यापीठात पॅट्रिक गेडेस यांच्या मार्गदर्शनाखाली समाजशास्त्र विभाग स्वतंत्रपणे सुरू झाला तेव्हापासून भारतात समाजशास्त्राला एक स्वतंत्र विद्याशाखा म्हणून दर्जा मिळाला. त्यानंतर मात्र भारतीय समाजशास्त्रज्ञांच्या अथक प्रयत्नांमधून भारतात हे शास्त्र विकसित होत गेले. ज्यांनी भारतात समाजशास्त्रीय अभ्यासाचा पाया रोवला, त्यामध्ये प्रामुख्याने जी.एस. घुर्ये, आर. के. मुखर्जी, डी. पी. मुखर्जी, बी. एन. सील, बी. के. सरकार, एम. एन. श्रीनिवास, ए. आर. देसाई, इरावती कर्वे, एस. सी. दुबे इत्यादींचा समावेश होतो.

जी.एस. घुर्ये, एम.एन. श्रीनिवास आणि इरावती कर्वे यांची भारतीय समाजशास्त्राच्या विकासातील भूमिका व योगदान आपण अभ्यासणार आहोत.

### डॉ. जी.एस. घुर्ये – (१८९३ ते १९८३)



डॉ.जी.एस.घुर्ये

गोविंद सदाशिव तथा जी.एस. घुर्ये यांना भारतीय समाजशास्त्राचे जनक संबोधले जाते. स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय समाजशास्त्राची उभारणी करताना समाजशास्त्रज्ञांची पहिली पिढी त्यांनी तयार केली. त्यांनी १९५२ मध्ये 'Indian Sociological Society' या संस्थेची स्थापना करून Sociological Bulletin या नियतकालिकाची सुरवात केली.

डॉ. जी. एस. घुर्ये यांच्या लेखनात संकल्पना आणि परिप्रेक्ष्यांची खूप विविधता दिसून येते. त्यांच्या अभ्यासाचा कल हा मुख्यत्वेकरून जगाच्या विविध भागांतील संस्कृतींच्या उत्क्रांतीचा अभ्यास करणे हा होता. त्यांनी विशेषकरून भारतातील संस्कृतीचा सविस्तर अभ्यास केला. त्यांनी केलेल्या जातिव्यवस्थेचा अभ्यास हा महत्त्वाचा संदर्भ म्हणून वापरला जातो.

**डॉ. घुर्ये यांचे भारतीय जमातींविषयीचे विश्लेषण :** डॉ. जी.एस. घुर्ये यांनी जमातींचा अभ्यास सामान्य आणि वैशिष्ट्यपूर्ण अशा दोन्ही पद्धतींनी केला. अनुसूचित जमातींवरील ग्रंथात त्यांनी ऐतिहासिक, प्रशासकीय आणि सामाजिक

बाजूंवर भर दिला आहे. तसेच त्यांनी महाराष्ट्रातील महादेव कोळी जमातीचा स्वतंत्र अभ्यास केला आहे.

ज्या काळात अनेक प्रस्थापित मानववंशशास्त्रज्ञ व प्रशासक असे मत व्यक्त करत होते की, आदिवासी जमातींची स्वतंत्र ओळख कोणत्याही परिस्थितीत जपली गेली पाहिजे त्याच काळात डॉ. जी.एस. घुर्ये यांचा आदिवासींवरील प्रबंध प्रकाशित झाला. त्या दरम्यान वसाहतवादी प्रशासक आदिवासींची अनुसूची बनवत होते. सरकारी मानववंशशास्त्रज्ञ आदिवासींना संरक्षण देण्याच्या बाजूने होते व राष्ट्रवादी मंडळी त्यांना विरोध करत होती. राष्ट्रवादी मंडळींच्या मते, त्यांना संरक्षण देऊन किंवा त्यांना परिघाबाहेर ठेवून 'फोडा आणि राज्य करा' हीच नीती अमलात आणली जात आहे.

भारतातील विविध भागांतील 'आदिवासींचे हिंदूकरण' होण्याची जी एक प्रदीर्घ प्रक्रिया दिसून येत होती तिचा अभ्यास डॉ. जी.एस. घुर्ये यांनी केला. घुर्ये यांच्या मते, गणेश, काली, शिव या आदिवासींच्या दैवतांना आर्यांच्या इंद्र, विष्णू आणि ब्रह्मा यांच्या बरोबरीने स्थान मिळू लागले. भारतीय समाजातील विविध संस्कृतींची सांगड घालण्यासाठी आत्मवाद, कुलप्रतिकवाद व निसर्गवाद यांचा आधार घेतला गेला. त्यातूनच भारतातील जमातींना हिंदू मानले जाऊ लागले. घुर्ये असे म्हणतात की, त्यामुळेच स्वेच्छेने ते स्वतःला हिंदू संस्कृतीत सामावून घेऊ लागतात. ताना भगत, विष्णू भागवत, कबीर पंथी आणि इतर अनेक आदिवासी पुढाऱ्यांनी हिंदू संस्कृती आदिवासींमध्ये रुजवण्याचा प्रयत्न केला व त्यामुळे अनेक आदिवासी जमाती या स्वतःला हिंदू मानू लागल्या.

डॉ. घुर्ये यांचे जमातींविषयीचे विश्लेषण हे मुख्यतः त्यांच्या राष्ट्रवादी धारणेचे द्योतक होते. त्यांच्या मते, भारतीय समाजात ऐक्य प्रस्थापित करण्याचे एकमेव महत्त्वाचे साधन म्हणजे जाती आणि जमातींमधील सांस्कृतिक ऐक्य होय.

**डॉ. जी.एस. घुर्ये यांचे भारतातील जाती व्यवस्थेसंबंधीचे विचार :** १९३२ मध्ये प्रकाशित झालेला डॉ. जी.एस. घुर्ये यांचा 'Caste and Race in India' हा ग्रंथ भारतीय समाजशास्त्रात अत्यंत महत्त्वपूर्ण मानला जातो. भारतातील जातिव्यवस्था आणि नातेसंबंध यांचा अभ्यास करण्यासाठी त्यांनी या ग्रंथात ऐतिहासिक, मानव वंशशास्त्रीय आणि समाजशास्त्रीय परिप्रेक्ष्यांचा एकत्रितपणे अभ्यास केला आहे. डॉ. जी.एस. घुर्ये यांनी जातिव्यवस्थेचा अभ्यास ऐतिहासिक, तुलनात्मक आणि एकात्मिक दृष्टिकोनातून केला. अंतर्विवाह हे जातिव्यवस्थेचे सर्वांत महत्त्वाचे वैशिष्ट्य डॉ.जी. एस.घुर्ये यांनी मानले. त्यांच्या मते, जातिव्यवस्थेचा अभ्यास हा भारतातील बदलत्या वास्तवाच्या संदर्भात केला गेला पाहिजे. त्यांच्या मते जातिव्यवस्था हा भारतीय, सामाजिक आणि राजकीय जीवनातील एक ज्वलंत प्रश्न आहे. डॉ. घुर्ये यांचे जातिविषयक विश्लेषण अधिक विस्तृतपणे सातव्या पाठामध्ये दिले आहे.

## डॉ. एम.एन. श्रीनिवास (१९१६-१९९९)


डॉ.एम.एन. श्रीनिवास

म्हैसूर नरसिंहचार श्रीनिवास यांचा जन्म म्हैसूरमध्ये १६ नोव्हेंबर १९१६ रोजी झाला. म्हैसूर येथे सुरुवातीचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी मुंबई विद्यापीठामध्ये समाजशास्त्र विभागात प्रवेश घेतला आणि प्रोफेसर डॉ. जी.एस. घुर्ये यांचे ते विद्यार्थी झाले.

त्यांच्या ब्राह्मणीकरण, संस्कृतीकरण, पाश्चिमात्यीकरण, धर्मनिरपेक्षता आणि प्रभावी जाती

या संकल्पनांचा आजही मोठ्या प्रमाणावर अभ्यास केला जातो.

## प्रभावी जातीची संकल्पना

भारतीय समाज हा जातिव्यवस्थेवर आधारित आहे. प्राचीन काळापासून भारतात अनेक जाती अस्तित्वात आहेत. त्यांच्यात परस्पर सहकार्य आणि सुसंवादही आहे. त्याचबरोबर त्यांच्यात परस्परावलंबन आणि संघर्षही आहे. जेव्हा एखादी जात दुसऱ्या जातीवर प्रभाव गाजवते किंवा कनिष्ठ मानलेल्या जातीचे शोषण करते तेव्हा संघर्ष निर्माण होतो. भारतात सर्वत्र जातीय विषमता आढळून येते.

डॉ.श्रीनिवास यांच्या मते, भारतीय जातिव्यवस्थेच्या चौकटीत असणाऱ्या सर्व जाती या वेगवेगळ्या स्थानांवर आहेत. त्यांच्यात विषमता आहे. काही जाती या खूप असंघटित अवस्थेत आहेत तर काही अत्यंत संघटित आहेत. त्यांच्याकडे सत्ता, प्रतिष्ठा आणि संख्याबळ आहे. त्यामुळे त्यांचा समाजावर वेगळा प्रभाव असतो. अशा जातींना श्रीनिवास 'प्रभावी जाती' किंवा 'प्रबळ जाती' असे म्हणतात.

## प्रभावी जातीची व्याख्या

"एखाद्या जातीचे संख्याबळ जेव्हा इतरांपेक्षा वाढते, त्यामुळे त्या जातीकडे आर्थिक आणि राजकीय सत्ता येते व त्यामुळे जेव्हा स्थानिक श्रेणी रचनेत त्यांचा दर्जा वाढतो तेव्हा त्या जातीला प्रभावी जात असे म्हणतात."

**त्यांनी प्रभावी जात ही संकल्पना पुढील सहा घटकांच्या आधारे स्पष्ट केली आहे.**

१. मोठ्या प्रमाणावर लागवडीयोग्य जमिनी (स्थानिक भागातील) ची मालकी
२. संख्याबळ
३. स्थानिक श्रेणी रचनेत उच्च स्थान (उच्च धार्मिक दर्जा)
४. पाश्चिमात्य शिक्षण
५. आर्थिक आणि राजकीय सत्तेचा उपभोग
६. जातीच्या सदस्यांनी उच्च व्यवसाय स्वीकारणे.

**श्रीनिवास यांनी दिलेली प्रभावी जातीची उदाहरणे–**

१. कर्नाटकातील लिंगायत आणि ओकालिगा
२. आंध्रप्रदेशातील रेड्डी आणि कम्मा
३. केरळमधील नायर आणि एरवा
४. तमिळनाडू मधील गोंडर, मुदलीयार आणि पद्याची

**उपक्रम – २**

जाती या मुद्द्याशी संबंधित पाच लेखांचे वाचन करा (उदा., प्रतिनिधित्व, जातीय अत्या–चार, आरक्षण) आणि काढलेल्या निष्कर्षांवर चर्चा करा.

## डॉ. इरावती कर्वे (१९०५–१९७०)


डॉ. इरावती कर्वे

इरावती कर्वे यांचा जन्म १५ डिसेंबर १९०५ रोजी म्यानमारमधील म्यांजान येथे झाला. नामवंत समाज सुधारक महर्षी धोंडो केशव कर्वे यांच्या त्या स्नुषा होत्या.

डॉ. इरावती कर्वे यांनी अनेक इंग्रजी आणि मराठी पुस्तकांमध्ये ८० पेक्षा अधिक शोधनिबंध प्रकाशित केले. समाजशास्त्र, मानववंशशास्त्र आणि मराठी साहित्यात त्यांचे मोलाचे योगदान आहे.

नातेसंबंधांची संकल्पना – डॉ. इरावती कर्वे यांनी 'Kinship Organization in India' (1953) या अत्यंत महत्त्वाच्या ग्रंथातून भारतातील नातेसंबंधांचे सूक्ष्म विश्लेषण केले आहे. भारतातील विविध

भागांतील नातेसंबंधांचे तुलनात्मक चित्रण त्यांच्या नातेसंबंधांवरील ग्रंथात आपल्याला दिसून येते. या ग्रंथात आपल्याला नातेसंबंधांबाबतच्या महत्त्वाच्या संकल्पना प्रमुख भारतीय भाषांमध्ये समजावून घेता येतात. तसेच त्यांचा भाषिक आशय, वर्तन, दृष्टिकोन, वारसाहक्काबाबतचे नियम, विवाह आणि कुटुंबाचे प्रकार याबद्दलचे विस्तृत विश्लेषण समजते.

नातेसंबंध ही प्राथमिकतः एक सामाजिक सांस्कृतिक संकल्पना असून परिणामतः ती कौटुंबिक, जातीय आणि भाषिक घटकांशी संबंधित आहे. एका भाषिक गटात दिसणारे नातेसंबंध हे जातीय आणि कौटुंबिक गटातही आढळतात.

नातेसंबंध संघटनांचा अभ्यास करताना त्यांनी उत्तर, मध्य, दक्षिण आणि पूर्व याप्रमाणे भौगोलिक घटकांनुसार तसेच इंडो युरोपियन, द्रविडीयन अशा भाषिक प्रदेशांच्या आधारे देखील केला आहे. भौगोलिक घटकांनुसारही नातेसंबंधांची पद्धती बदलते. तशीच ती भाषिक घटकांनुसारही बदलते.

या पाठात आपण समाजशास्त्राचा विकास आणि वैचारिक जडणघडण कशी झाली आहे हे समजून घेतले. ऑगस्ट कॉम्त, एमिल डरखाईम, कार्ल मार्क्स या युरोपियन, तसेच जी.एस. घुर्ये, एम.एन.श्रीनिवास आणि इरावती कर्वे या भारतीय विचारवंतांचे योगदान आपण पाहिले. या वैचारिक योगदानातून समाजशास्त्राचा पाया घातला गेला आहे हे आपण जाणून घेतले.

## सारांश

- कॉम्तने 'तीन अवस्थांचा नियम' हा समाजशास्त्रातील महत्त्वपूर्ण सिद्धान्त मांडला.
- डरखाईमने आत्महत्या हे सामाजिक तथ्य मानले व आत्महत्येचे चार प्रकार सांगितले.
- मार्क्सने भांडवलशाही व्यवस्थेची मूलभूत चिकित्सा केली. त्याचे महत्त्वाचे प्रतिपादन म्हणजे, 'मानवी इतिहास हा वर्ग संघर्षांचा इतिहास आहे.' मार्क्सचे वर्गसंघर्षाचे विश्लेषण हे आर्थिक घटकांवर आधारित आहे.
- डॉ. जी.एस. घुर्ये यांनी मुंबई विद्यापीठात स्वतंत्र समाजशास्त्र विभाग स्थापन केला. त्यांना भारतीय समाजशास्त्राचे जनक म्हटले जाते.
- प्रभावी जाती ही संकल्पना हे एम. एन. श्रीनिवास यांचे समाजशास्त्रातील महत्वाचे योगदान आहे. आजही या संकल्पनेचे महत्व भारतीय समाजात टिकून आहे.
- डॉ. इरावती कर्वे यांनाही भारतीय समाजशास्त्रात मानाचे स्थान आहे. त्यांचे समाजशास्त्र आणि सामाजिक मानववंशशास्त्रात मोठे योगदान आहे.
- भारतातील नातेसंबंध ही त्यांनी मांडलेली संकल्पना ही सामाजिक व सांस्कृतिक संकल्पना आहे.

## स्वाध्याय

**प्र.१ (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१. औद्योगिक क्रांती ............ येथे झाली.
(उत्तर अमेरिका, युरोप, ऑस्ट्रेलिया)

२. विज्ञान ............ यावर अवलंबून असते.
(विश्वास, तथ्ये, अंदाज)

३. भारतातील नातेसंबंधांवर ............ या महिला समाजशास्त्रज्ञांनी अत्यंत महत्वाचे काम केले.
(डॉ. इरावती कर्वे, सुमा चिटणीस, नीरा देसाई)

४. समाज विकासाच्या ............ या अवस्थेचे वैशिष्ट्य म्हणजे यात स्पष्टीकरणांचे स्वरूप अस्पष्ट असते पण पूर्णतः दैववादी नसते.
(धार्मिक, भौतिक, प्रत्यक्षवादी)

**(ब) चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा.**

१. (i) अब्दुल रहमान इब्न खाल्दुन – उत्तर आफ्रिका

(ii) ऑगस्ट कॉम्त – फ्रान्स

(iii) हॅरियट मॉर्टिनॉ – इंग्लंड

(iv) कार्ल मार्क्स – रशिया

**(क) प्रत्येक विधान वाचा आणि चौकटीत दिलेल्या योग्य संज्ञा ओळखून लिहा.**

| |
|---|
| ध्रुवीकरण, डॉ. एम.एन. श्रीनिवास, आर. एन. मुखर्जी |

१. मार्क्सच्या मते वर्ग हे शेवटी पूर्णपणे परस्पर विरोधी होतील.

२. या भारतीय समाजशास्त्रज्ञाने पाश्चिमात्यीकरण ही संकल्पना मांडली.

**(ड) अधोरेखित शब्दाच्या जागी अचूक शब्द लिहून विधाने पूर्ण करा.**

१. समाजाच्या ज्या अवस्थेत अनुभवाधिष्ठित बाबींनाच स्पष्टीकरणाचे आधार मानले जाते ती म्हणजे धार्मिक अवस्था होय.

२. 'Le Suicide' हा ग्रंथ हॉब्ज यांनी लिहिला.

**प्र.२ (अ) दिलेल्या संकल्पनेचे योग्य उदाहरण लिहा व तुमच्या उत्तराचे समर्थन करा.**

१. आत्मकेंद्रित आत्महत्या

२. प्रभावी जात

**(ब) टीपा लिहा.**

१. डॉ. जी.एस. घुर्ये यांचे भारतीय समाजशास्त्रातील योगदान


२. डरखाईमने सांगितलेले आत्महत्येचे प्रकार

**प्र.३ फरक स्पष्ट करा.**

१. धार्मिक अवस्था आणि प्रत्यक्षवादी अवस्था

२. प्रमाणक शून्य आत्महत्या आणि परार्थवादी आत्महत्या

**प्र.४ (अ) पुढील संकल्पना चित्र पूर्ण करा.**




**(ब) खालील विधाने चूक की बरोबर हे सांगून सकारण स्पष्ट करा.**

१. मार्क्सच्या मते, भांडवलशाही पद्धतीमध्ये कामगारांमधील आपलेपणाची भावना वाढीस लागते.

२. इरावती कर्वे यांनी भारतातील नातेसंबंधाच्या अभ्यासामध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे

**प्र.५ आपले मत नोंदवा.**

१. जागतिकीकरणामुळे वर्गांचे अधिक जास्त ध्रुवीकरण झाले आहे असे वाटते का? ते उदाहरणासहीत स्पष्ट करा.

२. नातेसंबंधांची परिणामकारकता कमी होत आहे असे तुम्हांला वाटते का? कारणे द्या.

**प्र.६ खालील प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा. (साधारण १५०–२०० शब्द)**

१. तुम्ही कॉम्तच्या मानवी विचाराच्या तीन अवस्थांचा नियम अभ्यासले आहेत. कॉम्तच्या पहिल्या व तिसऱ्या अवस्थेच्या संदर्भाने भारतीय समाजातील आव्हानांची चर्चा करा.

**उपक्रम**

खाली दिलेल्या विषयांवर PPT किंवा पोस्टर्स बनवा.

१) समाजशास्त्रांचे योगदान.

२) स्त्री समाजशास्त्रज्ञ आणि त्यांचे योगदान.

३) सद्यकाळातील विद्यार्थ्यांच्या किंवा शेतकऱ्यांच्या आत्महत्या आणि त्याची सामाजिक कारणे.

***